महाराष्ट्र राज्यासाठी सिंचन, घरगुती व औद्योगिक
प्रयोजनार्थ वापरल्या जाणा-या पाण्यासाठी ठोक
जलदराचे पुनर्विलोकन व सुधारणा.

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण
९ वा मजला, सेंटर १, जागतिक व्यापार केंद्र,
कफ परेड, मुंबई ४००००५
दि. १८ जून २०२६

## ठोक जलप्रशुल्क निर्धारण आदेश

[यासोबत वाचावे : महाराष्ट्र राज्याकरिता ठोक जलप्रशुल्क निर्धारणाचे अंतिम निकष नियंत्रण कालावधी जुलै २०२६ ते जून २०२९]

संदर्भ :- १) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम २००५.

२) ठोक जल प्रशुल्क निर्धारणाकरता दृष्टीनिबंध (एप्रिल - २०२४)

३) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (ठोक जल प्रशुल्क निर्धारणाकरिता निकषांचे निश्चितीकरण व आदेश काढणे), मार्गदर्शक सूचना २०१९.

४) महाराष्ट्र राज्याकरिता ठोक जलप्रशुल्क निर्धारणाचे अंतिम निकष नियंत्रण कालावधी जुलै २०२६ ते जून २०२९

## १.० प्रस्तावना

१.१ महाराष्ट्र राज्यातील जलसंपत्तीचे विनियमन करण्याकरिता, तसेच जलसंपत्तीचे कुशल समन्याय व टिकाऊ व्यवस्थापन, वाटप व वापर सुकर करण्याकरिता व पाण्याचे दर निश्चित करण्याकरिता महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम २००५ (यापुढे

MAHARASHTRA WATER RESOURCES REGULATORY AUTHORITY * MUMBAI *

"अधिनियम" असे संबोधले आहे) पारित करण्यात आला. कलम ३(१) अन्वये अधिनियमातील तरतुदीच्या प्रयोजनार्थ दि. ४ मे २००५ रोजी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (यापुढे "प्राधिकरण" असे संबोधले आहे) गठित करण्यात आले.

१.२ अधिनियमातील कलम ११(घ) अन्वये सिंचन व्यवस्थापनाच्या प्रशासकीय कार्यचालन व परिरक्षणाच्या संपूर्ण खर्चाची वसुली परावर्तीत होईल अशा तऱ्हेने पाण्याचे दर (जलप्रशुल्क) निर्धारणाची पद्धत ठरविण्याचे आणि पाणीपट्टीचे निकष ठरविण्याचे अधिकार प्राधिकरणास प्रदान करण्यात आलेले आहेत.

१.३ अधिनियमाचे कलम ११(प) अन्वये दर तीन वर्षांनी पाणीपट्टीचे पुनर्विलोकन व पुनरीक्षण करण्याची तरतूद आहे.

१.४ यापूर्वी प्राधिकरणाने दि. ११ जानेवारी २०१८ रोजीच्या आदेशान्वये राज्यातील घरगुती, औद्योगिक व सिंचन क्षेत्रातील पाणी वापरासाठीचे ठोक जलदर निश्चित केलेले होते.

१.५ अधिनियमातील तरतूदीनुसार प्राधिकरणाने प्रारुप निकष व प्रारुप जलप्रशुल्क प्रस्तावावर विविध उपभोक्त्यांची मते विचारात घेऊन विहित केलेल्या निकषाद्वारे घरगुती, सिंचन औद्योगिक ठोक जलप्रशुल्क निर्धारित केले आहेत.

## प्राधिकरणाचे आदेश

२.० अधिनियमातील कलम ११(घ) व ११(प) अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून महाराष्ट्रातील सिंचन, घरगुती व औद्योगिक प्रयोजनार्थ वापरल्या जाणाऱ्या पाण्यासाठीचे ठोक जल प्रशुल्क (पाणीपट्टी) चे सुधारित दर सोबतच्या परिशिष्ट १ ते ३ मध्ये नमूद केलेल्या अनुषंगिक तरतूदीसह लागू होतील.

२.१ प्रवाही सिंचनाचे दर परिशिष्ट १ मधील तक्ता क्र. १ नुसार राहतील. खाजगी उपसा सिंचन योजनांचे (उसिंयो) दर परिशिष्ट १ मधील तक्ता क्र. २ नुसार राहतील.

२.२ शासकीय उपसा सिंचन योजनांचे (शा.उ.सि.यो.) दर हे प्रवाही सिंचन योजनांच्या दराएवढेच असतील. तथापि, उपसा सिंचन योजनांच्या मुख्य कामासंबंधित ऊर्जा खर्च, देखभाल व दुरुस्ती खर्च तसेच संचालन खर्च यांचा भार नदी खोरे अभिकरण अथवा राज्य शासन यांच्यामार्फत करण्यात येईल.

MAHARASHTRA WATER RESOURCES REGULATORY AUTHORITY * MUMBAI *

२.३ सिंचनासाठी पुरवठा केले जाणारे पाणी हे घनमापन पद्धतीनेच दिले जाईल आणि त्याचे घनमापन पद्धतीचे दर हे परिशिष्ट १ मध्ये दर्शविल्याप्रमाणे राहतील. परंतु, ज्या ठिकाणी मोजमाप यंत्रे नसतील त्या ठिकाणी तक्ता क्र. ३ परिशिष्ट १ प्रमाणे राहतील.

२.४ घरगुती वापरासाठीचे अनुज्ञेय दर (Applicable Rate) परिशिष्ट २ नुसार राहतील.

२.५ औद्योगिक वापरासाठीचे अनुज्ञेय दर (Applicable Rate) परिशिष्ट ३ नुसार राहतील.

३.० पाणी वापराच्या हिशोबासाठी जलवर्ष १ जुलै ते पुढील वर्षाच्या ३० जून पर्यंत असे विचारात घ्यावे.

४.० या आदेशान्वये निर्धारित केलेले ठोक जल प्रशुल्क दर जलवर्ष १ जुलै, २०२६ पासुन पुढील ३ वर्षासाठी लागू राहतील.

५.० या आदेशातील परिशिष्टामधील दर हे १ जुलै, २०२६ ते ३० जून, २०२७ करिता लागू राहतील.

६.० १ जुलै, २०२७ ते ३० जून, २०२८ करिताचे पाण्याचे दर हे परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या दरामध्ये १० % वार्षिक वाढ करून आकारण्यात यावेत.

७.० १ जुलै, २०२८ ते ३० जून, २०२९ करिताचे पाण्याचे दर हे परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या दरामध्ये २० % वार्षिक वाढ करून आकारण्यात यावेत.

८.० परिशिष्ट १, २ व ३ मधील दर हे स्थानिक उपकराव्यतिरिक्त आहेत. शासनाकडून वेळोवळी निश्चित केल्यानुसार स्थानिक उपकर स्वतंत्ररित्या देय राहतील.

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (ठोक जलप्रशुल्क निर्धारणाकरिता निकषांचे निश्चितीकरण व आदेश काढणे ), मार्गदर्शक सूचना, २०१९' मधील कलम ३(१०) अन्वये,ठोक पाणीपुरवठा गट, पाणी वापरकर्त्यागटाकडून पाणीपट्टी बरोबर नियामक शुल्क (प्रत्यक्षात वसूल झालेल्या पाणीपट्टीच्या १%) वसूल करेल आणि ते प्राधिकरणाकडे जशी मिळाली असेल तशी त्रैमासिकरीत्या जमा करेल. यापुढे, घरगुती

MAHARASHTRA WATER RESOURCES REGULATORY AUTHORITY * MUMBAI *

आणि औद्योगिक पाणी वापरासाठी वरीलप्रमाणे नियामक शुल्क आकारले जाईल. (सिंचन वगळण्यात आले आहे.)

९.० उपलब्ध पाण्याचा इष्टतम वापर व्हावा, आरक्षित पाणी विना वापर राहू नये यासाठी बिगरसिंचन वापरकर्त्यास टप्पा नियोजनाची मुभा देण्यात येत आहे. बिगर सिंचन पाणी वापरकर्ता त्यांना मंजूर पाणी वापराचा विनियोग टप्प्याटप्प्यात करणार असल्यास याबाबतचे नियोजन त्यांनी जलसंपदा विभागास करारापूर्वी द्यावे. या पाणी वापराचा टप्पा नियोजनाची तरतुद करारात करण्यात यावी. पाणीपट्टीची आकारणी या टप्पा नियोजनामधील पाणी वापरानुसार करण्यात यावी. मात्र उर्वरित पाण्याच्या परिमाणावर (एकूण मंजूर पाणी - टप्पा नियोजनातील पाणी) ५% दराने हमीशुल्काची आकारणी करावी. तसेच प्रत्यक्ष पाणी वापर व टप्पा नियोजनातील पाणी वापर यात १०% पेक्षा जास्त विचलन असल्यास पुढीलप्रमाणे आकारणी करावी. प्रत्यक्ष पाणी वापर टप्पा नियोजनातील पाणी वापराच्या परिमाणाच्या ९०% पेक्षा कमी असल्यास टप्पा नियोजनातील परिमाणाच्या ९०% इतक्या परिमाणावर आकारणी करावी. प्रत्यक्ष वापर हा टप्पा नियोजनातील परिमाणाच्या ९०% ते १००% या मर्यादेत असल्यास अनुज्ञेय दराने आकारणी करावी. मात्र प्रत्यक्ष वापर टप्पा नियोजनातील परिमाणाच्या १००% पेक्षा जास्त असल्यास अशा जास्तीच्या परिमाणावर परिशिष्टात नमूद तदनुषंगीक तरतूदीनुसार दंडनीय दराने आकारणी करावी.

१०.० सिंचन प्रकल्प हे आठमाही प्रकल्प म्हणून (खरीप व रबीसाठी) संकल्पित असल्यामुळे घरगुती व औद्योगिक ठोक पाणी वापरकर्त्यांनी त्यांच्या उन्हाळी हंगामाच्या मागणीसाठी आवश्यक पाण्याचा साठा करण्याची व्यवस्था करावी.

११.० (More crop per drop) हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आणि प्रवाही सिंचनादरम्यान होणारी पाण्याची नासाडी रोखण्यासाठी, या दर आदेशाद्वारे पाणीपुरवठयाचे दर घनमापन पद्धतीने करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. तथापि, पाणी मोजण्याचे साधन उपलब्ध नसल्यास, 'परिशिष्ट १' मधील तक्ता क्र. ३ नुसार दर आकारला जाईल. पाणी मोजण्याची साधने १ जुलै २०२७ पूर्वी बसवली जातील याची जबाबदारी संबंधित महामंडळांच्या कार्यकारी संचालकांची राहील; या कामाच्या प्रगतीचा आढावा शासन किंवा प्राधिकरणाद्वारे वेळोवेळी घेतला जाईल.

MAHARASHTRA WATER RESOURCES REGULATORY AUTHORITY * MUMBAI *

१२.० राज्य शासनाने नागरी भागातील सांडपाणी प्रक्रिया-पुनर्चक्रीकरण व पुनर्वापर धोरण नगर विकास विभागाच्या दि. ३१ ऑक्टोबर, २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार जाहीर केलेले आहे. या धोरणातील तरतुदीनुसार प्रक्रियायुक्त पाण्याच्या पुनर्वापराची दरनिश्चिती करण्याचे अधिकार उक्त धोरणातील परिच्छेद १२ मध्ये नमूद केलेली समिती / संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था यांना आहेत. सदर धोरणामुळे खालील बाजूच्या जलस्त्रोताच्या गुणवत्तेत होणारी वाढ तसेच सांडपाण्याच्या पुनर्वापरामुळे नैसर्गिक पाण्यावरील ताण कमी होण्यास मदत होत असल्याने अधिनियमातील कलम १२(५) मधील तरतुदीनुसार प्राधिकरण जाणीवपूर्वक सदर धोरणास पाठिंबा (Support) देत आहे. मात्र हे धोरण राबवताना खालील तरतुदीचे अनुपालन होणे गरजेचे आहे.

अ) प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा पुनर्वापर करण्यासाठी प्रक्रिया केलेले सांडपाण्याचे वहन प्रक्रिया केंद्रावरून बंदिस्त नलिकेद्वारे अथवा टँकरने करण्यात यावे.

आ) प्रक्रिया केलेल्या पाण्याचा सिंचन प्रयोजनार्थ पुनर्वापरासाठीचा दर प्रवाही सिंचनासाठी अनुज्ञेय दराच्या ६०% पेक्षा अधिक असणार नाही.

इ) प्रक्रिया केलेले सांडपाणी कालव्यात / नैसर्गिक नदी किंवा नाल्यामध्ये सोडल्यास अश्या पाण्याचे विनियमन महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम १९७६ च्या कलम ११(१) नुसार करण्यात यावे. या पाण्याच्या वापरासाठीचे दर नैसर्गिक पाण्यानुसारच राहतील.

ई) शासनाच्या नगर विकास विभागाच्या दि. ३१ ऑक्टोबर, २०२५ रोजी जारी केलेल्या शासन निर्णयातील धोरणानुसार, पिण्याव्यतिरिक्त अन्य प्रयोजनांच्या कारणांसाठी पाणी वापराचा परवाना देण्यापूर्वी, जलसंपदा विभागाने ५० किमीच्या परिसरातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे प्रक्रिया केलेले सांडपाणी उपलब्ध नसल्याबाबत नगर विकास विभागाकडून 'ना-हरकत प्रमाणपत्र' घेणे आवश्यक आहे.

१३.० बिगर सिंचन पाणी पुरवठ्याचे करार करताना खालील बाबींचा अंतर्भाव करार नाम्यात असेल याबाबत ठोक जल पुरवठा गटाने (Bulk Water Supply Entity) आणि ठोक जल वापरकर्ता (Bulk Water User Entity) यांनी दक्षता घ्यावी.

क) पाण्याच्या स्त्रोताची अचुक वर्गवारी (source)

ख) विविध उपयोगांसाठी आवश्यक असलेल्या पाण्याची वर्गवारीनुसार प्रत्यक्ष परिमाण

MAHARASHTRA WATER RESOURCES REGULATORY AUTHORITY ★MUMBAI★

ग)	अनुज्ञेय दराबाबत सुस्पष्ट तरतूद.

घ)	पाणी स्त्रोताचा प्रकार, अनुज्ञेय दर आणि पाण्याच्या वापराचे परिमाण यांबाबतच्या कोणत्याही वादासाठी वाद निवारण यंत्रणा / तरतूद.

ङ)	औद्योगिक पाणी वापरासाठी वाटप (quota) निश्चित करताना, प्रवर्ग 'अ' आणि प्रवर्ग 'ब' श्रेणीतील उद्योगांसाठीच्या पाण्याचे प्रमाण विचारात घेतले जाईल. औद्योगिक कामगारांच्या वसाहतींमधील घरगुती वापरासाठी लागणाऱ्या पाण्याचे परिमाण निश्चित केले जाईल आणि प्रत्यक्ष पाणी वापर हा विशिष्ट उद्देशासाठी ठरवून दिलेल्या वापराप्रमाणेच असेल याची खात्री केली जाईल. मंजूर वाटपापेक्षा अधिक पाणी वापर झाल्यास दंडात्मक दर आकारले जातील.

१४.० दरवर्षी ३० जून पर्यंत सर्व सिंचन महामंडळांनी पाणी वापर प्रवर्गनिहाय ३१ मार्च रोजी संपलेल्या आर्थिक वर्षातील जमा झालेली पाणीपट्टी, सिंचन प्रकल्पाच्या देखभाल-दुरूस्तीवर केलेला खर्च, शासकीय उपसा सिंचन योजनांच्या वीज देयकावरील खर्च, शासकीय उपसा सिंचन योजनांवरील देखभाल-दुरूस्ती खर्च, घरगुती व औद्योगिक वापरावरील सुट / सवलती यामुळे महसुलात झालेली घट व दंडनीय तरतुदींमुळे महसुलात झालेली वाढ याबाबतचा तपशील प्राधिकरणास पुढील धोरणात्मक आखणीसाठी उपलब्ध करून द्यावा. सदर माहिती नियमितपणे उपलब्ध करून न दिल्यास अशी कृती अधिनियमाचे **कलम २६** नुसार कारवाईस पात्र राहील.

१५.० या आदेशान्वये लागू ठोक जलप्रशुल्काबाबत लाभार्थी / उपभोक्त्यांना माहिती होण्यासाठी जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिध्दी देण्याची कार्यवाही स्थानिक क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी करण्याबाबत शासन स्तरावरून आदेश निर्गमित करावेत.

१६.० शासनाने १५ ऑक्टोबर, २०२४ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे, महामंडळांच्या कार्यकारी संचालकांना 'बिगर सिंचन महसूल' या स्त्रोतामधून ठराविक कालावधीत मीटर बसविण्याचे निर्देश दिले आहेत. मात्र, मीटर बसविल्यानंतर त्यांची देखभाल, कॅलिब्रेशन बदलणे आणि सुरक्षा याबाबत शासनाने अद्याप कोणतेही निर्देश दिलेले नाहीत. **त्यामुळे, आता यासंदर्भात शासनाने सर्व महामंडळांना त्वरित सविस्तर मार्गदर्शक सूचना जारी कराव्यात असे निर्देश देण्यात येत आहेत.**

MAHARASHTRA WATER RESOURCES REGULATORY AUTHORITY * MUMBAI *

१७.० **अडचणी दूर करण्याचे अधिकार** : सदर ठोक जलप्रशुल्क आदेशाची अंमलबजावणी करताना काही अडचणी निर्माण झाल्यास किंवा अधिक स्पष्टीकरण हवे असल्यास संबंधित ठोक पाणी वापरकर्ता / संबंधित सिंचन महामंडळ / शासन प्राधिकरणाकडे संदर्भ करू शकतील व याबाबतचा प्राधिकरणाचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.

१८.० सदर आदेश प्राधिकरणाच्या (www.mwrra.maharashtra.gov.in) या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

सहपत्र - परिशिष्ट १ ते ३

दिनांक: १८/०६/२०२६

स्थळ: मुंबई

सही/-

(डॉ. प्रभातकुमार जैन)
सदस्य (भू. व्य.)

सही/-

( श्री. राजेंद्र मोहिते )
सदस्य (जसं-अभियांत्रिकी)

सही/-

(श्रीमती **श्वेताली** ठाकरे )
अध्यक्ष

(श्री. सुनिल काळे)
सचिव
महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण

MAHARASHTRA WATER RESOURCES REGULATORY AUTHORITY
सत्यमेव जयते
★MUMBAI★

## परिशिष्ट १

### सिंचनाकरिता ठोक जल प्रशुल्क

### तक्ता क्र. १

### प्रवाही सिंचनाकरिता पाण्याचे घनमापन दर सन २०२६-२७

(रु.प्रति घमी/ १००० लिटर)

| अ.क्र. | उपभोक्ता प्रकार | दर (सन २०२६-२७) | | |
|---|---|---|---|---|
| | सिंचनासाठी पाणी पुरवठा | खरीप | रबी | उन्हाळी |
| १ | नोंदणीकृत पाणी वापर संस्था | ०.०८ | ०.१६ | ०.२४ |
| २ | वैयक्तिक लाभधारक | ०.१० | ०.२० | ०.३० |

### तक्ता क्र. २

### खाजगी उपसा सिंचन योजनांचे (उसिंयो) ठोक जल प्रशुल्क

(रु. प्रति घमी/१००० लिटर)

| अ.क्र. | पाणीपुरवठा प्रकार व स्रोत | दर (सन २०२६-२७) | | |
|---|---|---|---|---|
| | सिंचनासाठी पाणी पुरवठा | खरीप | रबी | उन्हाळी |
| १. | आश्वासित पाणी पुरवठा<br>अ) मोठया प्रकल्पांचे जलाशय | ०.०८ | ०.१७ | ०.२५ |
| | ब) मध्यम प्रकल्पांचे जलाशय, मोठ्या व मध्यम प्रकल्पांचे कालवे, साठवण तलाव | ०.०७ | ०.१३ | ०.२० |
| २. | वहनव्ययासह नियंत्रित पाणी पुरवठा | ०.०७ | ०.१३ | ०.२० |
| ३. | अंशत: आश्वासित पाणी पुरवठा | ०.०३ | ०.०७ | ०.१० |
| ४. | पाणी वापरकर्त्या गटाने स्वखर्चाने बांधलेला व स्वखर्चाने व्यवस्थापन होत असलेले धरण /बंधारा<br>अ. जलाशय/बंधारा तसेच खाजगी उपसा सिंचन पायाभूत सुविधा संबंधित पाणी वापरकर्ता संस्थेद्वारे स्वत:च्या खर्चाने उभारण्यात व देखभाल करण्यात आलेल्या असतील. | ०.०१ | ०.०२ | ०.०३ |
| | ब. जलाशय/बंधारा शासनामार्फत उभारण्यात व देखभाल करण्यात आलेला असेल; तथापि, खाजगी | ०.०२ | ०.०३ | ०.०५ |

MAHARASHTRA WATER RESOURCES REGULATORY AUTHORITY * MUMBAI *

| | उपसा सिंचन पायाभूत सुविधांसंबंधित पाणी वापरकर्ता संस्थेद्वारे स्वत:च्या खर्चाने उभारण्यात व देखभाल करण्यात आलेल्या असतील. | | | |
|---|---|---|---|---|

टीप: प्रवाही सिंचन व्यवस्थेद्वारे देखील सिंचनासाठी पाण्याचा लाभ घेणाऱ्या खाजगी उपसा सिंचन योजनेच्या लाभधारकांना खाजगी उपसा सिंचनासाठी अनुज्ञेय असलेली सवलत लागू राहणार नाही. अशा प्रकरणांमध्ये प्रवाही सिंचनासाठी विहित केलेल्या जलप्रशुल्क दरांनुसार आकारणी करण्यात येईल व कोणत्याही प्रकारच्या दुहेरी सवलतीचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

**तक्ता क्र. ३**

**प्रवाही सिंचनाकरिता वैयक्तिक लाभधारकांसाठी पाण्याचे क्षेत्राधारित ठोक जलप्रशुल्क (पिकनिहाय व हंगामनिहाय)**

| अ.क्र. | पिक प्रकार | दर (रु. प्रति हेक्टर) | | |
|---|---|---|---|---|
| | | खरीप | रबी | उन्हाळी |
| १ | ज्वारी व हरभरा | ४५० | ९०० | १३५० |
| २ | गहू | ९०० | १८०० | २७०० |
| ३ | भुईमूग | १०३३ | २०६७ | ३१०० |
| ४ | भात | ६७० | १३४० | २०१० |
| ५ | इतर अन्नधान्य पिके | ७२० | १४४० | २१६० |
| ६ | ऊस व केळी | २३७५ | ४७५० | ७१२५ |
| ७ | कापूस | ९०० | १८०० | २७०० |
| ८ | फळबाग लागवड | १७८० | ३५६० | ५३४० |

टीप: १) घनमापन आधारित लागू असलेल्या सर्व सवलती /दंड क्षेत्राधारितलाही लागू राहतील.

२) जलाशय/बंधारा तसेच खाजगी उपसा सिंचन पायाभूत सुविधा संबंधित पाणी वापरकर्ता संस्थेद्वारे स्वत:च्या खर्चाने उभारण्यात व देखभाल करण्यात आलेल्या असतील तर, त्यांना तक्ता क्र. ३ मध्ये नमूद केलेल्या दराच्या १० % दर लागू राहतील.

३) जलाशय/बंधारा शासनामार्फत उभारण्यात व देखभाल करण्यात आलेला असेल; तथापि, खाजगी उपसा सिंचन पायाभूत सुविधांसंबंधित पाणी वापरकर्ता संस्थेद्वारे स्वत:च्या खर्चाने उभारण्यात व देखभाल करण्यात आलेल्या असतील तर, त्यांना तक्ता क्र. ३ मध्ये नमूद केलेल्या दराच्या १६ % दर लागू राहतील.

MAHARASHTRA WATER RESOURCES REGULATORY AUTHORITY * MUMBAI * सत्यमेव जयते

**इतर अनुषंगिक तरतुदी :-**

१. जलप्रशुल्क आकारण्याच्या उद्देशाने कोकण व विदर्भ विभागासाठी आणि उर्वरित महाराष्ट्रासाठी खरीप, रबी आणि उन्हाळी हंगामाचा कालावधी खालीलप्रमाणे असेल;

| हंगाम | उर्वरित महाराष्ट्रासाठी कालावधी | कोकण व विदर्भ विभागासाठी कालावधी |
|---|---|---|
| खरीप | १ जुलै ते १४ ऑक्टोबर | १ जुलै ते १४ नोव्हेंबर |
| रबी | १५ ऑक्टोबर ते २८ फेब्रुवारी | १५ नोव्हेंबर ते ३१ मार्च |
| उन्हाळी | १ मार्च ते ३० जुन | १ एप्रिल ते ३० जुन |

२. लाभक्षेत्रातील कालव्यापासून ३५ मी. पर्यंतच्या विहिरींच्या पाण्याने सिंचित होत असलेल्या नगदी पिकांसाठी (उदा. ऊस, कापूस, केळी व फळबागा इ.) महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम, १९७६ चे कलम ५५ च्या तरतुदीनुसार प्रवाही सिंचनाच्या मूळ दराच्या ५०% दर लागू असेल.

३. शासन निर्णय दि. ०२/०५/२०१७ अनुसार, ठोक पाणी पुरवठा गटाने विकेंद्रीत पाणीसाठयापर्यंत पाणी उपलब्ध करुन दिल्यास, संबंधित वहन व्यवस्थेच्या म्हणजेच प्रवाही किंवा उपसा अनुरुप परिशिष्ट वरील तक्ता क्र. १ मध्ये नमूद केल्यानुसार जलप्रशुल्क लागू राहील. नैसर्गिक प्रवाहाद्वारे विकेंद्रित साठ्यापर्यंत नियमित पाणी पुरवठा केल्यास १०% वहनव्यय आकारले जाईल. मात्र जर लाभार्थ्यांने कालव्यातून बंदिस्त नलिकेद्वारे विकेंद्रित साठ्यापर्यंत पाणी घेतल्यास, वहनव्यय आकारला जाणार नाही.

४. मत्स्यशेतीकरिता सिंचनासाठी दर परिशिष्ट १ तक्ता क्र. १ अ. क्र. २ नुसार म्हणजेच वैयक्तिक लाभधारकांना अनुज्ञेय घनमापन दराने आकारणी करावी.

५. ज्या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना लाभक्षेत्रात पर्यायी जमिनी दिलेल्या आहेत त्यांना अनुज्ञेय दराच्या ७५% दराने आकारणी करण्यात यावी. तसेच, प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी स्वखर्चाने उपसा सिंचन राबवल्यास अनुज्ञेय दराच्या ५०% दराने आकारणी करावी.

६. खरीप पिक लांबल्यामुळे रबी हंगामामध्ये पाणी पुरविले असल्यास अथवा रबी पिकासाठी उन्हाळी हंगामात पाणी पुरविले तर लांबलेल्या सिंचनाच्या आवर्तनासाठी तत्सम खरीप / रबी दराने आकारणी करावी.

७. प्रकल्पावरील प्रथम वर्षाच्या सिंचनासाठी (चाचणी सिंचन) जलप्रशुल्काची आकारणी करू नये.

८. दोन पेक्षा जास्त पाळयांव्दारे पाणी देण्यात आले असल्यास त्या हंगामासाठी पूर्ण दराने आकारणी केली जाईल दोन पाळयांपर्यंत प्रत्येक पाणी पाळीस एक चतुर्थांश अनुज्ञेय दरानुसार आकारणी केली जाईल.

९. वैयक्तिक लाभधारकांनी आधुनिक पध्दतीचा (सुक्ष्म सिंचन) अवलंब करून जलमापक यंत्राद्वारे घनमापन पद्धतीने पाणी घेतले तर त्यांना अनुज्ञेय दराच्या ७५ % दराने आकारणी करावी. नोंदणीकृत पाणी वापर संस्थांनी घनमापन पद्धतीने पाणी मोजून घेऊन सुक्ष्म सिंचन केल्यास नोंदणीकृत पाणी वापर संस्थेसाठी प्रवाही सिंचनासाठी अनुज्ञेय केलेल्या दराच्या ७५% दराने आकारणी करावी.

MAHARASHTRA WATER RESOURCES REGULATORY AUTHORITY * MUMBAI *

१०. हंगाम सुरु होण्यापूर्वी त्या हंगामाच्या जलप्रशुल्काची पूर्ण आगाऊ अदायगी केली असेल तर त्या हंगामासाठी अनुज्ञेय दरामध्ये १०% सवलत दिली जाईल.

११. माजी मालगुजारी तलावांच्या पाणीवापराचे दर सर्वोच्च न्यायालयाच्या केस क्र. सिव्हील अपील क्र. २४७५ (१९६८) दि. १६/०८/१९७८ च्या निर्णयानुसार राहतील.

१२. जलसंपदा विभागाची पूर्वपरवानगी न घेता सिंचनासाठी उपलब्ध करून दिलेल्या पाण्याचा औद्योगिक वापर होत असल्याचे निदर्शनास आल्यास औद्योगिक वापरासाठी लागू असलेल्या दराच्या २.० पट दराने आकारणी करावी.

१३. ठोक पाणीपुरवठा गटाने (BWSE) ठोक पाणी वापरकर्त्यास (BWUE) देयक पाठविल्यानंतर देयकात नमूद विहित कालावधीत मागणी केल्यानुसार जलप्रशुल्क अदा न केल्यास वार्षिक १०% दराने दंडात्मक व्याज आकारावे.

१४. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ मधील कलम १२(७) नुसार, पुच्छ भागातील शेतकऱ्यांना पाणी उपलब्ध होईल याची खात्री करण्यासाठी नदी खोरे अभिकरण (RBA) "पुच्छ ते शीर्ष" तत्त्वाचे पालन करावे. तक्ता क्र. १ मध्ये नमूद केल्यानुसार प्रत्येक हंगाम समाप्त झाल्यानंतर ३० दिवसांच्या आत संबंधित प्रकल्पाच्या अधीक्षक अभियंत्यांनी याबाबत विहित नमुन्यातील (परिशिष्ट क्र. ४) प्रमाणपत्र वर्षाअखेर महामंडळामार्फत महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाकडे सादर करावे.

१५. जलसंपदा विभागाच्या दिनांक १५/१०/२०२४ रोजीच्या जलप्रशुल्क वसुली वाढीसंदर्भातील मार्गदर्शक सूचनांनुसार, नदी खोरे अभिकरण यांनी राज्यातील सर्व प्रकल्पांवर म.सिं.प.शे.व्य. कायदा, २००५ अंतर्गत पाणी वापर संस्था स्थापन करण्यात येतील व संबंधित क्षेत्र त्यांच्याकडे पुढील तीन वर्षांच्या कालावधीत (म्हणजेच दिनांक ३० जून २०२९ पर्यंत) हस्तांतरित करण्यात येईल, याची खात्री करावी. तसेच, सदर शासन निर्णयानुसार प्रत्येक लाभार्थ्यासाठी पाणी मोजणी यंत्रे बसविण्यात येतील, याचीही नदी खोरे अभिकरण यांनी खात्री करावी.

१६. जलसंपदा विभागाने नदी खोरे अभिकरण यांना निकषांची व जलप्रशुल्क आदेशांची काटेकोर अंमलबजावणी व संनियंत्रण करणे अनिवार्य करावे व त्यासाठी उद्दिष्टे (K.R.A) ठरवून द्यावीत.

१७. शासन निर्णय दिनांक २२/०६/२००७ नुसार पाणी वापर संस्थाकडून जल शुल्क वसुलीचा परतावा करण्यात यावा.

MAHARASHTRA WATER RESOURCES REGULATORY AUTHORITY * MUMBAI *

## परिशिष्ट २

## घरगुती पाणी वापरासाठीचे ठोक जल प्रशुल्क सन २०२६- २७

(रू प्रती घमी /१००० लिटर)

| अ. क्र. | पाणीपुरवठा प्रकार व स्त्रोत | सन २०२६- २७ साठी दर (स्थानिक स्वराज्य संस्था) | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ग्रामपंचायत | | नगरपालिका / नगरपंचायत | | महानगरपालिका | |
| | | घरगुती | वाणिज्य | घरगुती | वाणिज्य | घरगुती | वाणिज्य |
| १ | आश्वासित पाणी पुरवठा | ०.४० | २.०० | ०.५० | २.५० | ०.८० | ४.०० |
| २ | वहन व्ययासह नियंत्रित पाणी पुरवठा | ०.८० | ४.०० | १.०० | ५.०० | १.६० | ८.०० |
| ३ | अंशतः आश्वासित पाणी पुरवठा | ०.२० | १.०० | ०.२५ | १.२५ | ०.४० | २.०० |
| ४ | पाणी वापरकर्त्या गटाने प्रमाणशीर खर्चाचा वाटा उचललेला असेल. तसेच पाणी वापरकर्त्या गटाने पायाभूत सुविधा निर्माण केली आणि त्याची देखभाल केली. | ०.०६ | ०.३२ | ०.०८ | ०.४० | ०.१३ | ०.६४ |

टीप :

१) वरील प्रवर्गांसाठी पुरवठ्याचे स्त्रोत निकषामधील तक्ता क्र. ३ नुसार आहेत.

२) पाणीमंजुरीच्या अथवा प्रत्यक्ष वापराच्या यातील अधिक असेल त्याच्या प्रमाणातील वहनव्यय पाणी वापरकर्त्यांनी सोसावा. जर ठोक पाणीवापरकर्ताने सिंचनाची पाळी नसलेल्या कालावधीत पाण्याची मागणी केली आणि केवळ ती मागणी पूर्ण करण्यासाठीच कालव्यात किंवा नदीत पाणी सोडले गेले, तर स्त्रोताच्या किंवा धरणाच्या मुखाशी सोडण्यात आलेल्या पाण्याच्या सर्व परिमाणाचे शुल्क पाणीवापरकर्त्याकडून आकारले जाईल.

३) साठवणूक/जलाशयातील बाष्पीभवनामुळे होणारे नुकसान ठोक पाणीपुरवठादाराला सोसावे लागेल.

४) **जुन्या करारासाठी** पायाभूत सुविधांचा पूर्ण/प्रमाणशीर खर्च उचलण्याबाबत किंवा नविन प्रकल्पाच्या नियोजनाच्या टप्प्यात पायाभूत सुविधांचा खर्च उचलण्याबाबत सहमती झाल्यानुसार किंवा पाणी वापर गटाने धरणाच्या खालील बाजूस पाणी वापरासाठी त्याच्या वार्षिक मागणी एवढ्या क्षमतेच्या बंधारा / बांध बांधला असल्यास, अदा केलेल्या खर्चाच्या प्रमाणात जलप्रशुल्क अनुज्ञेय दराच्या १६% लागू असेल. अशा पाणी वापर गटाने पाणी वाटपाच्या प्रमाणशीर खर्चापैकी

MAHARASHTRA WATER RESOURCES REGULATORY AUTHORITY * MUMBAI *

दिलेली कोणतीही रक्कम ही आगाऊ जलप्रशुल्क समजण्यात येईल आणि ते अनुज्ञेय दराच्या १६% सवलतीच्या जलप्रशुल्काच्या तुलनेत समायोजित केले जातील. सवलतीचे दर किती वर्षांसाठी लागू असेल याची गणना १०% व्याजासह (Net Present Value, NPV) पद्धतीने काढण्यात येईल. आगाऊ प्रशुल्काचे पूर्ण समायोजन केल्यावर संबंधित अनुज्ञेय पूर्ण दर लागू होतील. आगाऊ प्रशुल्काचे समायोजनाबाबत ठोक पाणी पुरवठादाराने वेळोवेळी आढावा घ्यावा.

५) सर्व महानगरपालिका/नगरपरिषदा/ग्रामपंचायतींनी त्यांच्या कार्यक्षेत्रात विविध कामांसाठी (घरगुती, वाणिज्यिक आणि औद्योगिक) पुरवठा करावयाच्या पाण्याचे प्रति वर्ष घनमीटरमधील प्रत्यक्ष प्रमाण नमूद करणे आवश्यक आहे आणि असा तपशील त्यांच्या मागणी पत्रात नमूद केला पाहिजे तसेच तो कराराचा भागही असला पाहिजे.

६) व्यावसायिक वापरासाठी पाण्याचे दर घरगुती दरांच्या ५ पट राहतील.

७) महानगरपालिका, नगरपालिका किंवा ग्रामपंचायतींच्या अधिकारक्षेत्रात कार्यरत असलेल्या उद्योगांकडून, औद्योगिक वापराच्या विविध श्रेणींअंतर्गत विहित केलेल्या दराने शुल्क आकारले जाईल.

८) ग्रामपंचायत, नगरपालिका/नगरपरिषद, महानगरपालिका यांच्यासाठी पाण्याचे दर अनुक्रमे मूळ दराच्या ७५%, ९०% आणि १२५% राहतील.

९) नगरपंचायत/ग्रामपंचायतींच्या बाबतीत, दररोज १० घनमीटर किंवा त्याहून अधिक पाणी वापरणाऱ्या व्यावसायिक संस्थांना घरगुती वापराअंतर्गत “व्यावसायिक” या उप-प्रवर्गात आणले जाईल आणि त्यांच्याकडून नगरपंचायत/ग्रामपंचायतीच्या अनुज्ञेय दराच्या पाचपट शुल्क आकारले जाईल.

१०) जर कोणत्याही महानगरपालिकेने/नगरपालिकेने त्यांच्या घरगुती सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी सांडपाणी प्रक्रिया केंद्र स्थापित केले असतील, तर त्याचा तपशील आणि प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचे प्रमाण त्यांच्या मागणी पत्रात नमूद करणे आवश्यक आहे.

## इतर अनुषंगिक तरतुदी :-

१) महानगरपालिकेशी असलेल्या विद्यमान करारानुसार वार्षिक मागणी निश्चित करताना, व्यावसायिक आणि औद्योगिक वापराचे प्रमाण स्वतंत्रपणे निश्चित केले जाईल आणि त्यांवर परिशिष्ट २ व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे योग्य व्यावसायिक व औद्योगिक दर लागू केले जातील.

२) “एकात्मिक नगर वसाहत” (Integrated Township) म्हणजे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ मधील कलम १८ किंवा ४४ नुसार घोषित एकात्मिक नागरी वसाहत ज्यासाठी ठोक पाणी पुरवठादारांकडून थेट पाणी पुरवठा केला जातो. अशा नागरी वसाहतीकरिता महानगरपालिकांसाठी निर्धारित केलेल्या अनुज्ञेय दराप्रमाणे परिशिष्ट २ स्तंभ ५ दराने आकारण्यात येईल.

३) व्यापारी संस्था /खाजगी वसाहती / नागरी वसाहती (Townships) साठी बांधकाम चालू असेपर्यंत बांधकामासाठी सांडपाणी प्रक्रिया संयंत्रातून प्रक्रिया केलेले पाणी प्राधान्याने वापरले जाईल.

MAHARASHTRA WATER RESOURCES REGULATORY AUTHORITY ★ MUMBAI ★

बांधकामाकरिता जर फ्रेश पाणी वापरले तर अशा वापरलेल्या पाण्याकरिता वाणिज्य दराच्या दोनपट दराने जलप्रशुल्क आकारण्यात येईल व बांधकाम पूर्णत्वाचा दाखला / भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर होणाऱ्या पाणीवापरासाठी महानगरपालिकांसाठीचा अनुज्ञेय दर आकारला जाईल. दोन्ही वापर एकाच वेळी चालू असल्यास त्यासाठी वेगवेगळे जलमापक यंत्र बसवावेत व त्यानुसार आकारणी करावी.

४) जर ठोक पाणी वापर गटाने त्यांच्या कालव्याच्या जलसिंचन अधिपत्याखालील क्षेत्रातील विहिरीवर अवलंबून राहिल्यास (कालव्याची व्याख्या महाराष्ट्र जल सिंचन अधिनियम, १९७६ च्या कलम २(३) प्रमाणे असेल) त्यांना महाराष्ट्र जल सिंचन अधिनियम, १९७६ च्या कलम ५६ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे मूळ दराच्या परिशिष्ट २ मधील अनु. क्र. २ च्या ५०% दराने जल शुल्क आकारले जाईल.

५) मंजूर पाणी कोट्याच्या १००% पर्यंत वार्षिक पाणी वापराकरिता अनुज्ञेय दर आकारण्यात यावा. १००% ते १२५% पाणी वापराकरिता अनुज्ञेय दराच्या १.५० पट दर आणि १२५% पेक्षा जास्त वापरास अनुज्ञेय दराच्या ३.० पट दर आकारण्यात यावा.

६) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी सांडपाणी नैसर्गिक प्रवाहामध्ये अथवा कालव्यात सोडण्यापूर्वी त्यावर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्रमाणित मानकांनुसार प्रक्रिया करणे गरजेचे आहे. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्या पाणी वाटपाच्या आधारावर सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा (STP) स्थापित केली नसल्यास आणि / अथवा ती पूर्ण क्षमतेने कार्यरत नसल्यास, व प्रक्रिया केलेले पाणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निकषानुसार नसल्यास, मंजूर पाणी कोटा अथवा प्रत्यक्ष पाणी वापर यापैकी जे अधिक असेल त्यास अनुज्ञेय दराच्या तीन पट दराने आकारणी केली जाईल. गुणवत्ता नियंत्रणासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या वैध संमती व प्रयोगशाळा अहवाल हा ठोक पाणी वापर गटाने वापरकर्त्यांनी ठोक पाणीपुरवठा गटास उपलब्ध करून दिले जाईल व त्या आधारावर मागील कालावधीसाठी दंड आकारला जाईल. जर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्रयोगशाळा अहवाल (तीन महिन्यापेक्षा जुना नसावा) उपलब्ध नसेल तर पाणी गुणवत्ता निश्चित करण्यासाठी आणि आवश्यक कारवाई करण्यासाठी निकषातील परिच्छेद २.१४ मध्ये नमूद केलेला प्रयोगशाळा अहवाल विचारात घेतला जाईल. सांडपाणी प्रक्रिया केंद्राची माहिती पाणी मागणीपत्रात द्यावी आणि करारामध्ये अंतर्भूत करावी.

(७) करारनामा न करता वापरण्यात आलेल्या पाण्यासाठी तक्ता-३ अनुज्ञेय दर मध्ये नमूद केल्यानुसार संबंधित स्रोतनिहाय जलप्रशुल्काच्या दुप्पट दराने आकारणी करण्यात येईल. करारनाम्याच्या नूतनीकरणाच्या बाबतीत, करारनाम्याचा कालावधी संपल्याच्या दिनांकापासून पुढील ३ महिन्यांचा सवलत कालावधी (Grace Period) नदी खोरे अभिकरण (RBA) यांच्याकडून देण्यात येईल. सदर सवलत कालावधीत करारनाम्याचे नुतनीकरण न केल्यास, प्रलंबित देयके भरलेली असल्याच्या स्थितीत, सवलत कालावधी संपल्यानंतर नूतनीकरण केलेला करारनामा अंमलात येईपर्यंत प्रतिदिन रु. १००/- इतका दंड आकारण्यात येईल. थकबाकी अथवा प्रलंबित देयके असल्यास वरील दंडाची रक्कम दुप्पट आकारण्यात येईल. तथापि, करारनाम्याच्या नूतनीकरणाच्या

MAHARASHTRA WATER RESOURCES REGULATORY AUTHORITY ★ MUMBAI ★

प्रकरणात आकारण्यात येणारी एकूण दंडाची रक्कम संबंधित वार्षिक जलप्रशुल्काच्या दुप्पट रकमेपेक्षा अधिक असणार नाही.

८) ठोक पाणीपुरवठा गटाची (BWSE) पूर्वपरवानगी न घेता नागरी स्थानिक स्वराज्य संस्था पिण्याच्या पाण्याचे पाणी हक्कातून औद्योगिक वापरकर्त्यास पाणी पुरवठा करत असल्याचे निदर्शनास आल्यास अशा पाणी वापरासाठी अनुज्ञेय औद्योगिक दराच्या ३.० पट दराने पूर्वलक्षी प्रभावाने आकारणी करावी.

९) मीटर चालू नसल्यास/काढून ठेवले असल्यास/छेडछाड केली असल्यास/चुकीचे रिडींग दाखवत असल्याचे आढळून आल्यास मीटर दुरुस्त करण्यासाठी आणि चालू करण्यासाठी एक महिन्याची नोटीस दिली जाईल. जलमापक यंत्र ६० दिवसांमध्ये दुरुस्त करावे. या कालावधीतील मंजूर पाणी आरक्षण अथवा प्रत्यक्ष वापर यापैकी जे जादा असेल त्या परिमाणास अनुज्ञेय दराने आकारणी करावी. विशिष्ट स्थानिक परिस्थिती विचारात घेवून मीटर दुरुस्ती कालावधीस एक महिन्याची मुदतवाढ देता येईल. तथापि जलमापक यंत्र दुरुस्तीसाठी विहीत केलेल्या कालावधीत जलमापक यंत्र दुरुस्त करुन पूर्ववत न केल्यास दंडनीय दराने म्हणजेच अनुज्ञेय दराच्या २ पट दराने आकारणी करण्यात यावी.

१०) ठोक पाणी पुरवठा गटाने (BWSE) ठोक पाणी वापरकर्त्यास (BWUE) देयक पाठविल्यानंतर देयकात नमूद विहित कालावधीत मागणी केल्यानुसार जलप्रशुल्क अदा न केल्यास वार्षिक १०% दराने दंडात्मक व्याज आकारावे.

MAHARASHTRA WATER RESOURCES REGULATORY AUTHORITY ★MUMBAI★

## परिशिष्ट ३

## औद्योगिक पाणी वापरासाठीचे ठोक जल प्रशुल्क सन २०२६-२७

(रू. प्रतिघमी/ प्रति १००० लिटर)

| अ.क्र. | पाणीपुरवठा प्रकार व स्त्रोत | सन २०२६- २७ साठी दर | | |
|---|---|---|---|---|
| | | औद्योगिक प्रवर्ग अ | औद्योगिक प्रवर्ग ब | औद्योगिक घटकांतील घरगुती पाणी वापर |
| १ | आश्वासित पाणी पुरवठा | १३.५० | १०२.०० | ०.८० |
| २ | वहन व्ययासह नियंत्रित पाणी पुरवठा | २७.०० | २०२.०० | १.६० |
| ३ | अंशत: आश्वासित पाणी पुरवठा | ६.७५ | ५१.०० | ०.४० |
| ४ | पाणी वापरकर्त्या गटाने प्रमाणशीर खर्चाचा वाटा उचललेला असेल. तसेच पाणी वापरकर्त्या गटाने पायाभूत सुविधा निर्माण केली आणि त्याची देखभाल केली. | २.१६ | १६.५० | ०.१५ |

टीप:

१) वरील प्रवर्गांसाठी पुरवठ्याचे स्त्रोत निकषामधील तक्ता क्र. ४ नुसार आहेत.

२) पाणीमंजुरीच्या अथवा प्रत्यक्ष वापराच्या यातील अधिक असेल त्याच्या प्रमाणातील वहनव्यय पाणी वापरकर्त्यांनी सोसावा. साठवणुकीतील बाष्पीभवव्यय ठोक पाणीपुरवठा गटाने (BWSE) ने सोसावा. जर ठोक पाणीवापरकर्त्याने सिंचनाची पाळी नसलेल्या कालावधीत पाण्याची मागणी केली आणि केवळ ती मागणी पूर्ण करण्यासाठीच कालव्यात किंवा नदीत पाणी सोडले गेले, तर स्त्रोताच्या किंवा धरणाच्या मुखाशी सोडण्यात आलेल्या पाण्याच्या सर्व परिमाणाचे शुल्क पाणीवापरकर्त्याकडून आकारले जाईल.

३) साठवणूक/जलाशयातील बाष्पीभवनामुळे होणारे नुकसान ठोक पाणीपुरवठादाराला सोसावे लागेल.

४) जुन्या करारासाठी पायाभूत सुविधांचा पूर्ण/प्रमाणशीर खर्च उचलण्याबाबत किंवा नविन प्रकल्पाच्या नियोजनाच्या टप्प्यात पायाभूत सुविधांचा खर्च उचलण्याबाबत सहमती झाल्यानुसार किंवा पाणी वापर गटाने धरणाच्या खालील बाजूस पाणी वापरासाठी त्याच्या वार्षिक मागणी एवढ्या क्षमतेच्या बंधारा / बांध बांधला असल्यास, अदा केलेल्या खर्चाच्या प्रमाणात जलप्रशुल्क अनुज्ञेय दराच्या १६% लागू असेल. अशा पाणी वापर गटाने पाणी वाटपाच्या प्रमाणशीर खर्चापैकी दिलेली कोणतीही रक्कम ही आगाऊ जलप्रशुल्क समजण्यात येईल आणि ते अनुज्ञेय दराच्या

MAHARASHTRA WATER RESOURCES REGULATORY AUTHORITY * MUMBAI *

१६% सवलतीच्या जलप्रशुल्काच्या तुलनेत समायोजित केले जातील. सवलतीचे दर किती वर्षांसाठी लागू असेल याची गणना १०% व्याजासह (Net Present Value, NPV) पद्धतीने काढण्यात येईल. आगाऊ प्रशुल्काचे पूर्ण समायोजन केल्यावर संबंधित अनुज्ञेय पूर्ण दर लागू होतील. आगाऊ प्रशुल्काच्या समायोनाबाबत ठोक पाणी पुरवठादाराने वेळोवेळी आढावा घ्यावा.

५) **औद्योगिक प्रवार्गासाठीचा पाणीवापर** : कोणत्याही उद्योगाला औद्योगिक किंवा व्यावसायिक कारणांसाठी पुरवलेले पाणी, त्याचा अंतिम वापर प्रक्रिया, कच्चा माल किंवा उत्पादन यांपैकी कशासाठीही असो, प्रशासकीय कार्यक्षमता, पाण्याचा प्रभावी वापर आणि संवर्धनासाठी उद्योगाच्या श्रेणीनुसार वर्गीकृत केले जाईल. उद्योगाला पुरवलेल्या पाण्याची संपूर्ण मात्रा एकच एकक मानली जाईल आणि प्रक्रिया किंवा अंतिम वापराच्या आधारावर तिची विभागणी केली जाणार नाही, ज्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे:

i. **औद्योगिक प्रवर्ग 'अ' उद्योग**: औद्योगिक प्रवर्ग 'ब' अंतर्गत नमूद केलेल्या उद्योगांव्यतिरिक्त इतर उद्योगांना औद्योगिक प्रवर्ग **'अ'** म्हणून वर्गीकृत केले जाईल आणि लागू असलेल्या अनुसूचीनुसार पुरवठ्याच्या स्रोताशी निगडित दराने शुल्क आकारले जाईल.

ii. **औद्योगिक प्रवर्ग 'ब' उद्योग**: क्षारयुक्त शुद्ध पाणी, बाटलीबंद पिण्याचे पाणी, पेय उद्योग (मद्ययुक्त आणि मद्यविरहित), शीतपेये, अल्कोहोल आणि इथेनॉल उत्पादन, मद्यनिर्मिती उद्योग, आसवनी, द्राक्षापासून बनवलेले मद्यार्क उद्योग यांसारख्या उत्पादनांचे उत्पादन करणारे उद्योग, **तसेच तत्सम प्रकारचे उद्योग** - औद्योगिक प्रवर्ग ब मध्ये वर्गीकृत केले जातील. औद्योगिक प्रवर्ग ब साठी लागू असलेला दर हा औद्योगिक प्रवर्ग अ साठी विहित केलेल्या दराच्या साडेसात पट असेल.

परंतु: जैवइंधन म्हणून इथेनॉलच्या उत्पादनासाठी आसवानीद्वारे वापरलेले पाणी औद्योगिक प्रवर्ग अ उद्योग म्हणून गणले जाईल आणि त्यासाठी औद्योगिक प्रवर्ग अ दराने शुल्क आकारले जाईल. तथापि, जैवइंधनाव्यतिरिक्त इथेनॉलच्या उत्पादनासाठी वापरलेले पाणी औद्योगिक प्रवर्ग ब उद्योग म्हणून गणले जाईल आणि त्यानुसार औद्योगिक प्रवर्ग ब अंतर्गत शुल्क आकारले जाईल.

परंतु, एकाच कारखान्यात औद्योगिक प्रवर्ग अ आणि औद्योगिक प्रवर्ग ब प्रकारचे उद्योग असल्यास, योग्य परवानगी आणि करारनाम्यातील तरतुदीनुसार स्वतंत्र पायाभूत सुविधा उभाराव्या लागतील आणि स्वतंत्र मीटर्स बसवावे लागतील.

## इतर अनुषंगिक तरतुदी :-

१. **"उद्योगातील घरगुती वापर"** म्हणजे संबंधित उद्योग /उपक्रमात कार्यरत अधिकारी /कर्मचारी यांच्या निवासासाठी संबधीत उद्योगाने विकसित केलेली वसाहत असा असून त्यासाठी परिशिष्ट ३ स्तंभ ३ नुसार दर आकारण्यात यावा. तथापि, उद्योगांसोबत करारनामा करण्यापूर्वी

MAHARASHTRA WATER RESOURCES REGULATORY AUTHORITY * MUMBAI *

"उद्योगातील घरगुती वापर" याचे स्वतंत्रपणे परिमाण निश्चित करावे आणि त्यासाठी स्वतंत्र वितरण वाहिनी व जलमापक यंत्र आणि आवश्यक पायाभूत सुविधा इत्यादींबाबत पूर्तता करावी.

२. जर ठोक पाणी वापर गटाने त्यांच्या कालव्याच्या जलसिंचन अधिपत्याखालील क्षेत्रातील विहिरीवर अवलंबून राहिल्यास (कालव्याची व्याख्या महाराष्ट्र जल सिंचन अधिनियम, १९७६ च्या कलम २(३) प्रमाणे असेल) त्यांना महाराष्ट्र जल सिंचन अधिनियम, १९७६ च्या कलम ५६ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे मूळ दराच्या परिशिष्ट ३ मधील अनु. क्र. २ च्या ५०% दराने जल शुल्क आकारले जाईल.

३. "कृषी उद्योग" जसे साखर उद्योग व त्यासोबतचा सहऊर्जा निर्मिती प्रकल्प, अन्नधान्य व फळ प्रक्रिया, कुक्कुटपालन, भात गिरणी, दुग्ध व्यवसाय, वनस्पतीजन्य तेल आणि तुप इ. साठी अनुज्ञेय दराच्या ७५% दराने आकारणी करावी. मात्र ऊस, मका किंवा तत्सम धान्य किंवा फळांपासून मद्य व इथेनॉल निर्मिती, वाइन तयार करणारी केंद्रे (वायनरी), बिअर तयार करणारे कारखाने (ब्रुअरीज), आसवानी,सुगंधी द्रव्ये इत्यादी निर्मितीसाठी ही सवलत अनुज्ञेय असणार नाही. वरील व्यतिरिक्त, केवळ जैवइंधन इथेनॉलचे उत्पादन करणाऱ्या सर्व धान्य आधारित आसवानी प्रकल्प प्रवर्ग "अ" उद्योगाचे दर लागू होतील.

४. मंजूर पाणी कोट्याच्या १००% पर्यंत वार्षिक पाणी वापराकरिता अनुज्ञेय दर आकारण्यात यावा. १००% ते १२५% पाणी वापराकरिता अनुज्ञेय दराच्या १.५० पट दर आणि १२५% पेक्षा जास्त वापरास अनुज्ञेय दराच्या ३.० पट दर असतील.

५. औद्योगिक संस्थांनी सांडपाणी नैसर्गिक प्रवाहामध्ये अथवा कालव्यात सोडण्यापूर्वी त्यावर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्रमाणित मानकांनुसार प्रक्रिया करणे गरजेचे आहे. औद्योगिक संस्थांनी सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा (ETP) स्थापित केलेली नसल्यास अथवा ती पूर्ण क्षमतेने कार्यरत नसल्यास, अथवा प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याची गुणवत्ता म.प्र.नि.मं. च्या निकषानुसार नसल्यास मंजूर पाणी कोटा अथवा प्रत्यक्ष पाणी वापर यापैकी जे अधिक असेल त्यास अनुज्ञेय दराच्या तीन पट दराने आकारणी केली जाईल. गुणवत्ता नियंत्रणासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या वैध संमती व पाणी गुणवत्ता प्रमाणपत्र हा ठोक पाणी वापर गटाने वापरकर्त्यांनी ठोक पाणीपुरवठा गटास उपलब्ध करून दिले जाईल व त्या आधारावर मागील कालावधीसाठी दंड आकारला जाईल. जर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्रयोगशाळा अहवाल तीन महिन्यापेक्षा जुना नसावा उपलब्ध नसेल तर पाणी गुणवत्ता निश्चित करण्यासाठी आणि आवश्यक कारवाई करण्यासाठी निकषातील परिच्छेद २.१४ मध्ये नमूद केलेला पाणी गुणवत्ता प्रमाणपत्र विचारात घेतला जाईल. मंजूर केलेल्या पाणी कोट्यातून निर्माण झालेले औद्योगिक सांडपाणी करारात नमूद करावे. जर ते सुधारित केले तर पुरवणी करारात नमूद करावे.

६. उद्योगांनी शून्य द्रव विसर्ग (Zero Liquid Discharge) तंत्रज्ञानाचा अवलंब केला आणि त्यांच्या पाणी वितरण प्रणाली मधील व्यय, बाष्पीभवन आणि प्रक्रियेतील वापर यासाठी वाटपाच्या २५% पर्यंत पाणीवापर केला तर त्या पाणी वापरास अनुज्ञेय दराच्या फक्त २५% जलप्रशुल्क आकारले

MAHARASHTRA WATER RESOURCES REGULATORY AUTHORITY * MUMBAI *
सत्यमेव जयते

जाईल. तथापि, सदर उद्योगासाठी वार्षिक मंजूर पाणी मागणी किमान ७५% च्या मर्यादेपर्यंत वा त्यापेक्षा कमी करीत असेल तरच सदर सवलत अनुज्ञेय राहील. याबाबतची खातरजमा कार्यकारी अभियंता यांचेपेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्याने करुन तसे लेखी प्रमाणीत करणे अनिवार्य राहिल.

७. उद्योगांना प्रक्रिया केलेले सांडपाण्याचा पुनर्वापर करता येईल. मात्र प्रक्रिया केलेले पाणी पुनर्वापरासाठी प्रक्रिया केंद्रावरून बंदिस्त नलिकेद्वारे (नदी नाल्यामध्ये न सोडता) उचलणे आवश्यक राहील. असे पाणी शेतीसाठी पुरविल्यास या साठीचा दर नैसर्गिक पाण्याच्या सिंचनासाठी विहित केलेल्या दराच्या ६०% पेक्षा जास्त नसावा. तसेच अशा पाणी वापराचा तपशील जलसंपदा विभागास सादर करावा.

८. भारत सरकारच्या २०१६ च्या सुधारित ऊर्जा धोरणानुसार, ५० किमीच्या परिसरात असलेल्या औष्णिक विद्युत केंद्रांनी केवळ सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांमधून मिळणाऱ्या प्रक्रिया केलेल्या पाण्याचाच वापर करणे अपेक्षित आहे.

९. करारनामा न करता वापरण्यात आलेल्या पाण्यासाठी तक्ता-३ अनुज्ञेय दर मध्ये नमूद केल्यानुसार संबंधित स्त्रोतनिहाय जलप्रशुल्काच्या तिप्पट दराने आकारणी करण्यात येईल. करारनाम्याच्या नूतनीकरणाच्या बाबतीत, करारनाम्याचा कालावधी संपल्याच्या दिनांकापासून पुढील ३ महिन्यांचा सवलत कालावधी (Grace Period) नदी खोरे अभिकरण (RBA) यांच्याकडून देण्यात येईल. सदर सवलत कालावधीत करारनाम्याचे नुतनीकरण न केल्यास, प्रलंबित देयके भरलेली असल्याच्या स्थितीत, सवलत कालावधी संपल्यानंतर नूतनीकरण केलेला करारनामा अंमलात येईपर्यंत प्रतिदिन रु. १००/- इतका दंड आकारण्यात येईल. थकबाकी अथवा प्रलंबित देयके असल्यास वरील दंडाची रक्कम दुप्पट आकारण्यात येईल. तथापि, करारनाम्याच्या नूतनीकरणाच्या प्रकरणात आकारण्यात येणारी एकूण दंडाची रक्कम संबंधित वार्षिक जलप्रशुल्काच्या तिप्पट रकमेपेक्षा अधिक असणार नाही.

१०. जलमापक यंत्र बंद असल्यास/दुरुस्तीसाठी काढून ठेवले असल्यास / छेडछाड केली असल्यास / चुकीचे रिडींग दाखवत असल्याचे आढळून आल्यास सदर जलमापक यंत्र दुरुस्त करण्यासाठी आणि पूर्ववत करण्यासाठी एक महिन्याची लेखी पूर्वसुचना देण्यात यावी. जलमापक यंत्र ६० दिवसामध्ये दुरुस्त करावे. या कालावधीतील मंजूर पाणी आरक्षण अथवा प्रत्यक्ष वापर यापैकी जे जादा असेल त्या परिमाणास अनुज्ञेय दराने आकारणी करावी. विशिष्ट स्थानिक परिस्थिती विचारात घेवून जलमापक यंत्र दुरुस्ती कालावधीस एक महिन्याची मुदत वाढ देता येईल. तथापि, जलमापक दुरूस्तीसाठी विहित केलेल्या कालावधीत जलमापक यंत्र दुरुस्त करुन पूर्ववत न केल्यास दंडनीय दराने म्हणजेच २ पट दराने आकारणी करण्यात यावी.

११. ठोक पाणीपुरवठा गटाने (BWSE) ठोक पाणी वापरकर्त्यास (BWUE) देयक पाठविल्यानंतर देयकात नमूद विहित कालावधी मागणी केल्यानुसार जलप्रशुल्क अदा न केल्यास वार्षिक १०% दराने दंडात्मक व्याज आकारावे.

MAHARASHTRA WATER RESOURCES REGULATORY AUTHORITY ★ MUMBAI ★
सत्यमेव जयते

परिशिष्ट - ४

मी, ________________________________________, अधीक्षक अभियंता, ________________________ पाटबंधारे मंडळ, याद्वारे शपथेवर असे प्रमाणित करतो/करते की, माझ्या कार्यक्षेत्रातील जलसंपदा प्रकल्पांमधील सिंचनासाठी पाणी वितरणाचे संचालन व व्यवस्थापन हे जलवर्ष ________________ मधील खरीप, रबी व उन्हाळी हंगामातील सर्व पाळ्यांमध्ये "पुच्छ ते शीर्ष" (Tail to Head Irrigation)" या तत्त्वानुसार करण्यात आले आहे.

हंगामनिहाय पाळीनिहाय अनुपालन अहवाल:

| अ. क्र. | जलसंपदा प्रकल्पाचे नाव | हंगाम | पाळी क्रमांक व कालावधी | शेवटच्या टोकापर्यंत पाणी पोहोचले काय? (होय/नाही) | शेवटच्या टोकापर्यंत पाणी न पोहोचण्याची कारणे | करण्यात आलेल्या सुधारात्मक उपाययोजना | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | खरीप/ रबी/ उन्हाळी | | | | | |
| | | खरीप/ रबी/ उन्हाळी | | | | | |
| | | खरीप/ रबी/ उन्हाळी | | | | | |

शेवटच्या टोकापर्यंत पाणी न पोहोचण्याची संभाव्य कारणे:

- जलाशयामध्ये अपुरा पाणीसाठा असणे
- कालव्याला भगदाड पडणे अथवा नुकसान होणे
- अनधिकृत पाणी उपसा अथवा अतिक्रमणे
- माथ्याकडील लाभधारकांकडून पंपाद्वारे पाणी उपसा
- मोठ्या प्रमाणात गाळ साचणे अथवा तण वाढणे
- दरवाजे अथवा संरचनांमध्ये यांत्रिक बिघाड होणे
- कार्यकारी अडचणी अथवा आपत्कालीन परिस्थिती निर्माण होणे
- इतर कारणे (नमूद करावीत)

MAHARASHTRA WATER RESOURCES REGULATORY AUTHORITY ★ MUMBAI ★

मी याद्वारे घोषित करतो/करते की, वरील माहिती खरी व अचूक असून कोणतीही महत्त्वाची बाब लपविण्यात आलेली नाही.

स्थळ : ____________________________

दिनांक : _____________________________

(स्वाक्षरी व कार्यालयीन शिक्का)

अधीक्षक अभियंता

_________________________ पाटबंधारे मंडळ

---

**पडताळणी**

मी, ________________________________________, कार्यकारी संचालक, _____________________________, यांनी वरील प्रमाण पत्रासंदर्भातील अभिलेखांची पडताळणी केली असून माझ्या माहितीनुसार व विश्वासानुसार या प्रमाणपत्रामध्ये नमूद केलेली माहिती विभागीय अभिलेख व निरीक्षण अहवालांवर आधारित असून ती खरी व अचूक आहे.

स्थळ : ____________________________

दिनांक : _____________________________

(स्वाक्षरी)

कार्यकारी संचालक

---